# TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 6 | **Subject:** Marathi | **Time:**1 hrs
**Date:** 04-08-2025 | **Paper:** Unit 1 | **Marks:**20

**Q1) पुढील उताऱ्याचा आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **(6)**

घरी येताच तोंडभर हसून मामीने आमचे स्वागत केले. मामाची मुले राजू अन् चिमी आमचीच वाट पाहत होती. आम्ही एकमेकांना कडकडून भेटलो. आजी हळूहळू चालत, काठी टेकवत टेकवत आमच्याजवळ आली. आम्ही आजीला बिलगलो. तिने आम्हांला जवळ घेतले. आमच्या डोक्यावरून, तोंडावरून हात फिरवला. तिच्या हाताचा थरथरणारा स्पर्श खूप प्रेमळ अन् बोलका होता. आम्हांला खूप गहिवरून आले.

दुसऱ्या दिवसापासून नुसती धमाल. विहिरीवर पोहायला जाणे, शेतात बागडणे, आंब्याच्या झाडावर चढून कैऱ्या, पाडाचा आंबा तोडून खाणे, बैलगाडीतून मामाबरोबर फेरफटका मारणे, आज शेतावर, तर उदया आमराईत मामाबरोबर फिरायला जाणे, रोज मजाच मजा.

आमची सुट्टी कधी संपली, ते आम्हांला समजलेच नाही. आम्ही परत गावी आलो.

(1) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा : (2)
(1) हाताचा .................... स्पर्श खूप प्रेमळ अन् बोलका होता.
(2) आमची ..................... कधी संपली ते आम्हांला समजलेच नाही.

(2) खालील वाक्यांसमोर खरे किंवा खोटे लिहा : (2)
(1) मामाची मुले राजू अन् चिमी आमच्या आगमनाची वाट पाहत होती.
(2) आम्ही सुट्टीत विहिरीवर पोहायला जाण्याचा आनंद घेतला नाही.

(3) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : (2)
(1) आजीने मुलांचे लाड कसे केले?
(2) मुले मामाबरोबर कुठे फिरायला जात?

**Q2) पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **(5)**

पाऊस आला ! पाऊस आला !
ऐन दुपारी विजा चमकल्या
कडाड कडकड भणाण वारा
जिकडे तिकडे गारा, गारा.

पाऊस आला ! पाऊस आला !
दिवाळीतला खचला किल्ला
भुंकत सुटली सगळी कुत्री
आजोबांनी शिवली छत्री !

(1) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा : (2)
(1) कडाड .................... भणाण वारा
(2) आजोबांनी .................... छत्री.

(2) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : (2)
(1) विजा केव्हा चमकल्या?
(2) पावसामुळे दिवाळीतला काय खचला?

TickMark.Ai

(3) खालील शब्दांचे वचन बदला : (1)

(1) किल्ले - (2) छत्र्या -

**Q3) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा** **(5)**

(1) खालील वाक्यातील नामाचे प्रकार ओळखून लिहा (1)

तांदूळ खाण्यासाठी आवडतो.

(2) खालील वाक्यातील नामे ओळखा (1)

मनीषा शाळेत जाते.

(3) खालील वाक्यातील सर्वनामाचे प्रकार ओळखून लिहा (1)

तो घरात आहे.

(4) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा (0.5)

माता -

(5) खालील शब्दांचे वचन बदला (0.5)

माणूस -

**Q4) खालील विषयावर निबंध लिहा (कोणीही एक) :** **(4)**

(1) माझी शाळा

(2) पावसाळ्यातील एक दिवस

All the Best

TickMark.Ai